# भगवान जगन्नाथ रथयात्रेत आमदार खताळ सहभागी



**संगमनेर (प्रतिनिधी)–** शहरातील राजस्थानी ब्राह्मण समाज आणि जगदीश मंदिर ट्रस्टच्यावतीने भगवान जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतिषबाजीमध्ये निघालेल्या या शोभायात्रेने संपूर्ण शहरात धार्मिक उत्साह व एकात्मतेचे वातावरण निर्माण केले. यामध्ये प्रथमच आमदार अमोल खताळ यांनी लोकप्रतिनिधी म्हणून सक्रिय सहभागी होत भगवान जगन्नाथाची पूजा-आरती करून कृपाशीर्वाद घेतला.

संगमनेर शहरातील कॅप्टन लक्ष्मी चौक येथील विठ्ठल मंदिराजवळ असलेल्या भगवान जगन्नाथ मंदिरापासून या शोभायात्रेला शुभारंभ झाला. ही शोभायात्रा बाजारपेठ, नगरपालिका मेनरोड मार्गे ही यात्रा बालाजी मंदिर ते श्रीकृष्ण मंदिरापर्यंत नेण्यात आली. श्रीकृष्ण मंदिर येथे आमदार खताळ यांच्यावतीने स्वागत कक्ष उभारण्यात आला होता. येथे त्यांनी रथाचे स्वागत करत समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान, शहरातील धार्मिक परंपरा, श्रद्धा आणि सामाजिक सलोखा जपणारे असे उत्सव समाजात एकात्मता आणि संस्कृतीची निर्माण करतात हीच खरी आपली ओळख आहे, आमदार अमोल खताळ म्हणाले.

# भोकर ते श्रीक्षेत्र पंढरपूर जगदंबामाता पायी दिंडीचे प्रस्थान

**भोकर (वार्ताहर)–** श्रीक्षेत्र भोकर ते श्रीक्षेत्र पंढरपूर श्री जगदंबामाता पायी दिंडी सोहळ्याचे मान्यवरांच्या हस्ते पादुकापूजन होवून प्रस्थान झाले. दिंडी सोहळ्यात मोठ्या संख्येने ग्रामस्थ भाविक सहभागी झाले होते.

श्रीरामपूर तालुक्यातील भोकरच्या इतिहासात पहिल्यांदाच ग्रामदैवत जगदंबा मातेच्या नावाने पायी दिंडी सोहळ्यास प्रारंभ झाला. श्रीक्षेत्र देवगडचे मठाधिपती गुरूवर्य भास्करगिरी महाराज, श्रीक्षेत्र गोदाधाम सराला बेटाचे मठाधिपती रामगिरी महाराज, श्रीक्षेत्र देवगडचे स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज, वैष्णव सेवाश्रमाचे मठाधिपती साहेबराव महाराज कांगुणे यांच्या कृपाशिर्वादाने येथील भागवताचार्य संतोष महाराज पटारे, शिवकृष्ण सेवाधामच्या मठाधिपती आरतीताई शिंदे महाराज यांच्या सहकार्याने व येथील श्री विठ्ठल सेवाश्रमाचे मठाधिपती सुदाम महाराज चौधरी यांच्या अधिपत्याखाली येथील भजनी मंडळांच्या पुढाकारातून पायी दिंडी सोहळ्यास प्रारंभ झाला. येथील पुरोहित योगेश दंडवते यांनी विधीवत पादुकापूजन केले.

यावेळी भागवताचार्य संतोष महारात पटारे, भागवताचार्य आरतीताई शिंदे महाराज, सुदाम महाराज चौधरी, निवृत्ती महाराज विधाटे, किरण महाराज हराळे, अशोकचे संचालक पुंजाहरी शिंदे, सरपंच शितलताई पटारे, उपसरपंच संदीप गांधले, सोसायटीचे चेअरमन महेश पटारे, व्हा. चेअरमन सागर शिंदे, अशोक कामगार पतपेढीचे संचालक आण्णासाहेब वाकडे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

अनेक ग्रामस्थांनी दिंडीसाठी ठिकठिकाणी चहा, नाष्टा व भोजन व्यवस्था केली आहे. दिलीप मांजरे यांनी दिंडीसाठी वायरलेस माईक सेवा दिली. दीपक पटारे मित्र मंडळाचे वतीने भक्तांना केळीप्रसाद व पाणी सेवा उपलब्ध करून देण्यात आली.

शिंदेवस्ती येथे रामदास शिंदे व पुंजाहरी शिंदे, खोकरफाटा येथे तुकाराम बिरदौडे व युवा मित्रमंडळाच्यावतीने स्वागत करण्यात आले. तर खोकर येथे अशोकचे माजी व्हा. चेअरमन पोपटराव जाधव, बाळासाहेब जाधव, दत्तागुरू जोशी, पत्रकार मयुर गव्हाणे, ज्ञानदेव पवार, रेवनन्नाथ भणगे, बाबासाहेब कोल्हे, भाऊसाहेब चव्हाण, अक्षय घावटे, बबलू गाडेकर व निलेश गाडेकर आदींनी केळी प्रसाद देत दिंडीचे स्वागत केले. यावेळी रामदास शिंदे, पोपटराव पटारे, बाबासाहेब विधाटे, नामदेव चव्हाण, राजेंद्र वाकडे, आण्णासाहेब वाकडे, भाऊराव सुडके, कारभारी तागड, सुदाम पटारे, ज्ञानेश्वर काळे, मच्छिंद्र काळे, ठकसेन खंडागळे, बाळासाहेब मुरकुटे, प्रताप पटारे, राम न्हावले, चंद्रकांत झुरंगे, भाऊसाहेब बेरड, अशोक काळे, राजेंद्र राहिंज, भास्कर डूकरे, अशोक चव्हाण, गंगाराम गायकवाड, आण्णासाहेब शेळके, संतोष चौधरी, पप्पू थोरात, दिलीप मांजरे, पांडूरंग गाढे, राहुल अभंग, राजीव तागड, रोहीदास तागड, रावसाहेब लोखंडे, नामदेव पटारे, वसंत शिंदे, नामदेव डूकरे, जतीन चौधरी, प्रकाश आहेर, अशोक गायकवाड व कान्हु आहेर आदी उपस्थित होते.



श्रीक्षेत्र भोकर ते श्रीक्षेत्र पंढरपूर जगदंबामाता पायी दिंडी प्रस्थानप्रसंगी वारकरी. (छाया- भानुदास बेरड)

# वाहन खरेदी टॅक्स वाढला

**मुंबई–** वाहन खरेदीचा टॅक्स आता उद्या १ जुलैपासून वाढविण्यात आला आहे. इंधनावरील (पेट्रोल/डिझेल) वाहनांसाठीचा टॅक्स एक टक्क्याने वाढविण्यात आला आहे, तर ३० लाखांपेक्षा अधिक किमतीची ई-वाहने खरेदी करताना आता सहा टक्के टॅक्स भरावा लागणार आहे.

यासंदर्भातील आदेश परिवहन आयुक्त कार्यालयाकडून काढण्यात आले आहेत. वाहने खरेदी करताना मोटार वाहन कायद्यानुसार निश्चित केलेली रक्कम टॅक्स स्वरूपात भरावी लागते. याच टॅक्सच्या रकमेत आता वाढ करण्यात आली आहे. येत्या जुलैपासून याची अंमलबजावणी करण्यात आली आहे. आता इंधनावरील वाहन खरेदी करताना एक टक्के अधिकचा टॅक्स भरावा लागणार आहे, तर इलेक्ट्रिकवरील ३० लाखांपेक्षा अधिक किमतीच्या वाहनाला सहा टक्के टॅक्स भरावा लागणार आहे.

## वाजे विद्यालयात अभिवादन

**सिन्नर–** येथील वाजे विद्यालयात शाहू महाराज जयंती व कालिदास दिनानिमित्ताने अभिवादन करण्यात आले. मुख्याध्यापक रामनाथ रायते, उपमुख्याध्यापिका मंगल हांडे, पर्यवेक्षक राम ढोली व विष्णू वाघ यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. लावण्या जाखड हिने अंमली पदार्थ विरोधी दिनाची माहिती दिली. श्रेया वाघ हिने कवी कालिदास यांच्याबद्दल माहिती सांगितली. सूत्रसंचलन श्रुती पवार व मानसी गाडे यांनी केले. प्रणिती गुळे हिने आभार मानले.

## बायपासच्या सर्व्हिस रोडची दुरवस्था

**सिन्नर–** नाशिक-पुणे महामार्गावरील सिन्नर बायपासवरील घोटी चौफुलीवरील सर्व्हिस रोडची दुरावस्था झाली असून ठिकठिकाणी खड्डे पडल्याने त्यातून मार्ग काढताना वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. या रस्त्याची दुरुस्ती करण्याची मागणी वाहनधारकांकडून होत आहे.

## वाचनालयात कालिदास दिन

**सिन्नर–** येथील सार्वजनिक वाचनालयात छत्रपती शाहू महाराज जयंती व महाकवी कालिदास दिन साजरा करण्यात आला. उपाध्यक्ष नरेंद्र वैद्य अध्यक्षस्थानी होते. संचालक मनीष गुजराथी व जितेंद्र जगताप यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन करण्यात आले. यावेळी विकास उकाडे, सचिन पांगारकर यांच्यासह वाचक उपस्थित होते.

## माजी सैनिकांकडून वृक्ष लागवड

**सिन्नर–** वनविभाग व माजी सैनिकांच्या संयुक्त विद्यमाने माळेगाव डोंगर परिसरात शेकडो वृक्षांची लागवड करुन वनमहोत्सव साजरा करण्यात आला. सिन्नर वनपरिक्षेत्र व भारतीय सैन्य दल तोफखाना विभाग १०१ मैदानी रेजिमेंटच्या आजी-माजी सैनिकांनी एकत्र येऊन १६१ विविध जातीच्या रोपांची लागवड केली. यावेळी कॅनल योगेंद्र सुरी, मेजर सुनील वाढवणे, भरत नारखेडे, विश्वास बोडके, किरण सहाणे, एस. बी. शिंदे, वनरक्षक संजय गिते उपस्थित होते.

# रात्री इंग्रजी पितात आणि निवडणुकीत मराठीप्रेम दाखवतात

## ठाकरे बंधूंवर भाजप आमदाराची टीका

**गोंदिया–** हिंदीसक्तीच्या मुद्द्यावरून दोन्ही ठाकरे बंधूंनी विरोध सुरू केला असून ५ तारखेला मोर्चा देखील काढण्यात येणार आहे. यावर भाजपचे आ. परिणय फुके यांनी ठाकरे बंधुंना टोला लगावला आहे. म मराठीचा की महानगरपालिकेचा असा सवाल त्यांनी विचारला. तसेच ते दिवसभर इंग्रजीत बोलतात, रात्री इंग्रजी पितात आणि निवडणुकीच्या वेळी दिशाभूल करण्याकरता यांचे मराठीप्रेम जागृत होतं अशी टीकाही आ. फुकेंनी केली.

राज्यातील शाळांमध्ये पहिलीपासून हिंदीसक्तीच्या निर्णयाला ठाकरे बंधुंनी विरोध केला होता. याच मुद्द्यावरून भाजपचे नेते आ. परिणय फुके यांनी ठाकरेंवर टीका केली. दोन्ही ठाकरे बंधुंची मुलं कोणत्या माध्यमातून शिकले आहेत असा प्रश्न आ. फुके यांनी केला. दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येणार का अशा चर्चा सर्वत्र सुरू असताना यावर परिणय फुके यांनी प्रतिक्रिया दिली. दोन्ही भाऊ एकत्र येऊन काही होत नाही, दोन्ही भावजया एकत्र यायला पाहिजेत. तर काहीतरी होऊ शकेल असा टोला त्यांनी लगावला.

उद्धव ठाकरे यांनी भाजपने ज्यांना मांडीवर घेतला आहे, ती असली शिवसेना नाही, असा टोला एकनाथ शिंदे यांना लगावला होता. यावर आ. फुके यांनी उद्धव ठाकरेंना सवाल केला, उद्धव ठाकरे यांना भाजपच्या मांडीवर येऊन बसायचे आहे का? असा सवाल त्यांनी केला. उद्धव ठाकरे यांच्या मनात असलेलं तोंडात आलं आहे असेही फुके म्हणाले.

**मनोज जरांगेंवर टीका**

मराठा आंदोलनासाठी मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा आंदोलनाचा इशारा दिला आहे. यावरून आ. फुके यांनी मनोज जरांगे वर चांगलीच टीका केली. निवडणुका आल्या की मनोज जरांगे बाहेर येतात आणि निवडणूक झाली की बिळात जाऊन लपतात अशी टीका आ.फुके यांनी केली. मनोज जरांगे स्टंटबाजी करतात, त्यांना मराठा आरक्षणाचं काही देणंघेणं नाही असा आरोपही आ. फुके यांनी केला.

पान १ वरुन

## हिंदी सक्तीवरून सरकारची माघार

यात ठाकरे गटाचे उपनेते विजय कदम यांचाही समावेश होता. या समितीने १०१ पानांचा अहवाल सादर केला. समितीचा एक उपगट होता. त्यात हेच विजय कदम देखील होते. या उपगटाने हिंदी भाषा पहिली ते बारावीपर्यंत सक्तीची करण्यात यावी, अशी शिफारस याच केली आहे. १४ सप्टेंबर २०२१ रोजी हा अहवाल सादर होऊन तो मंत्रिमंडळात सादर करण्यात आला. त्याचे इतिवृत्त तयार झाले. त्यावर मुख्यमंत्री म्हणून उद्धव ठाकरेंची सही आहे. इतिवृत्त मंजूर झाले आहे. त्यात कुठेही हा अहवाल स्वीकारताना त्रिभाषा सूत्र बाजूला ठेवा. आम्हाला हे मान्य नाही, असे कुठेच म्हटलेले नाही. हा अहवाल स्वीकारून त्याच्या अंमलबजावणीसाठी समिती तयार केली. याच समितीने पुढे निर्णय घेतले. आमच्या सरकारच्या काळात त्याचे शासन निर्णय निघाले, असा खुलासा फडणवीस यांनी यावेळी केला.

**आम्ही हिंदीला पर्याय दिला**

आमच्या सरकारने सक्तीच्या केलेल्या हिंदीला पर्याय देण्याचे काम केले. ज्यावेळी हिंदी सक्तीचा निर्णय झाला त्या मंत्रिमंडळात संपूर्ण शिवसेना होती. शरद पवारांचा पक्ष होता आणि काँग्रेसही होती. आम्हीच नव्हतो. सत्तेत असले की वेगळे बोलायचे, सत्तेतून बाहेर आले की वेगळे बोलायचे असा हा प्रकार आहे. आमच्यासाठी मराठी भाषा आणि मराठी विद्यार्थी महत्वाचा आहे. आमची निती मराठी केंद्रित आणि मराठी विद्यार्थी केंद्रित असेल. यात कोणतेही राजकारण करायचे नाही, असेही फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**जनसुरक्षा विधेयक येणार**

दरम्यान, विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात १२ विधेयके प्रस्तावित आहेत. जनसुरक्षा विधेयकाबाबत संयुक्त समितीने अहवाल दिला आहे. हे विधेयक या अधिवेशनात असेल. प्रचंड बहुमत असले तरी आम्ही चर्चेपासून पळ काढणार नाही.विरोधी पक्षाने चर्चा उपस्थित करावी, त्यांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्यास तयार आहोत, असेही फडणवीस यांनी सांगितले.

**विरोधी पक्षाच्या पत्रात चुका**

विरोधी पक्षांनी जे पत्र सरकारला दिले आहे त्या पत्रात व्याकरणाच्या २४ चुका आहेत. मागच्या वेळी भास्कर जाधवांची सही होती, पण ती यावेळच्या पत्रात दिसत नाही. विरोधकांनी दिलेले पत्र मोठे आहे, पण मजकूर मोठा नाही. फक्त फॉन्ट मोठा केला आहे, अशा शब्दात फडणवीस यांनी विरोधकांच्या पत्राची खिल्ली उडवली.

**मीच उद्धव ठाकरेंचे आभार मानतो**

हिंदीबाबतचा निर्णय घेतल्याने आम्ही भाऊ एकत्र येत आहोत त्याबद्दल मी मुख्यमंत्री फडणवीसांचे आभार मानतो, असे उद्धव ठाकरे म्हणाले होते. त्याबद्दल विचारले असता, उद्धव ठाकरेंनी ज्या प्रकारे मुख्यमंत्री म्हणून कारभार चालविला, त्यामुळेच आमचे सरकार येउ शकले. म्हणून मीच त्यांचे आभार मानतो. ते मराठी माणसाचा कैवार घेतात. पण पत्राचाळीतल्या मराठी माणसाचे काय, बीडीडी -अभ्युदय नगर, गिरगावातल्या मराठी माणसाचे काय? मुंबईतून जो मराठी माणूस गेला त्याला ते जबाबदार नाहीत काय? मराठी माणसाला घर देण्याचे काम आम्ही केले. मराठी माणसाचे नाव घ्यायचे आणि धनदांडग्यांच्या पाठिशी उभे राहायचे ही त्यांची निती आहे. मुंबई महापालिकेच्या मराठी शाळा बंद होऊन त्या सीबीएसईकडे कशा गेल्या याची संपूर्ण माहिती आमच्याकडे आहे. योग्यवेळी ती माहिती बाहेर काढू, असा इशाराही मुख्यमंत्री फडणवीस ठाकरे गटाला दिला.

**शिंदे यांचा आदित्य ठाकरे यांना टोला**

आमच्यावर महाविकास आघाडीचे नेते भ्रष्टाचाराचे आरोप करतात. पण सध्या मुंबईत अनेक घोटाळयांची चौकशी सुरू आहे. खिचडी घोटाळा, बॉडीबॅग घोटाळा या कोविड काळातील घोटाळयांची चौकशी तर सुरूच आहे. पण मिठी नदी भ्रष्टाचाराची पण चौकशी सुरू आहे. त्यात दिनो मोरियाची पण चौकशी सुरू आहे. आता त्या दिनो मोरियाने जर तोंड उघडले तर कोणाचा मोरया होईल हे दिसणार आहे, असा टोला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदित्य ठाकरे यांचे नाव न घेता लगावला. आम्ही हिंदीबाबतचे दोन्ही शासन निर्णय रद्द केले आहेत. आता राज आणि उद्धव ठाकरे यांना मोर्चा काढण्याचे कारणच उरलेले नाही. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेसाठी ३ हजार ६०० कोटी रूपये डीबीटीवर पाठविले आहेत. सोमवारी बहिणींच्या खात्यात पैसे जमा होतील, अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली.

**शिंदे सेनेचाही होता विरोध**

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत हिंदी भाषेबाबतचा मुद्दा चर्चेत आला होता. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने हिंदी भाषेबाबतच्या सरकारच्या निर्णयाला विरोध दर्शवला. यानिमित्ताने हिंदी भाषेला शिवसेना शिंदे गटाच्या मंत्र्यांचा देखील विरोध असल्याचं समोर आलं होतं, अशी चर्चा होती.

## आजपासून पावसाळी अधिवेशन...

कार्यकाळात झालेले घोटाळे, अत्याचाराच्या घटना, राज्यातील जनतेची व शेतकऱ्यांची सरकारकडून होत असलेली फसवणूक यावर ताशेरे ओढले. सत्ताधारी पक्षाचे लोकं वेगवेगळ्या गुन्ह्यात सहभागी आहेत, पोलिसांचं त्यांना संरक्षण आहे, मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री त्यांना प्रोत्साहन देतायतं, नेमकं भाजप आणि गद्दारांनी आपला महाराष्ट्र कुठं नेऊन ठेवला आहे, अशी टीका दानवे यांनी केली. या बैठकीला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते व आमदार आदित्य ठाकरे, प्रतोद व आमदार सुनील प्रभू, आमदार सचिन अहिर, काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस पक्षाचे विधिमंडळ उपनेते अमीन पटेल, काँग्रेसचे आमदार सतेज पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड, शशीकांत शिंदे उपस्थित होते.

यावेळी महाराष्ट्रद्वेष्ट्यांच्या चहापान कार्यक्रमाला जायचं म्हणजे पापच, असे आदित्य ठाकरे यावेळी म्हणाले. भ्रष्टाचाराचे डाग घेऊन जे लोकं चहापान कार्यक्रमाला जातील, त्याच लोकांकडे बघून मुख्यमंत्री म्हणतील, याच लोकांवर मी भ्रष्टाचाराचे आरोप केले होते, अशा शब्दांत आदित्य ठाकरे यांनी टोला लगावला. ज्या महामार्गाला माझ्या आजोबांचं नाव दिलं गेलं; त्यावरच खड्डे पडले आहेत, नदी वाहत आहे, हे नेमकं काय चाललंय? असा सवालही आदित्य ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केला.

## राहुरी तालुक्यात बनावट नोटांच्या...

त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्याजवळ २ लाख रुपयांच्या २०० आणि ५०० रुपयांच्या बनावट नोटा आढळून आल्या. ॲक्सीस बँक राहुरी शाखेचे व्यवस्थापक कैलास वाणी यांनी घटनास्थळी सदर नोटा बनावट असल्याची खात्री केली. त्यानंतर पथकाने मुद्देमाल जप्त करून आरोपींना गजाआड करून कसून चौकशी केली. त्यानंतर आरोपींनी आम्ही बनावट नोटा तयार करतो ते ठिकाण दाखवतो असे सांगीतल्याने राहुरी पोलीस पथकाने टेंभुर्णी येथील शितलनगर परिसरातील समाधान गुरव यांच्या इमारतीत भाड्याने घेतलेले घर गाठले. तेथे झेरॉक्स करण्याची मशीन व प्रिंटर, कटिंग करण्याची मशीन, नोटा बनवण्यासाठीचा कागद, नोटा मोजण्याचे मशीन, लॅमिनेशन मशीन, कंट्रोलर युनिट (सर्व मशिनरीची किंमत सुमारे ५ लाख रुपये), ५०० रुपये चलनाच्या बनावट नोटांचे एकूण ७५ बंडल, ज्याची किंमत ३७ लाख ५० हजार रुपये, २०० रुपये चलनाच्या बनावट नोटांचे एकूण ४४ बंडल, ज्याची किंमत ८ लाख ८० हजार रुपये, पाचशे रुपयांच्या प्रिंट केलेल्या नोटा, परंतु कट न केलेले कागदाचे बंडल्स (१८ लाख रुपये किमंतीचे) असा एकूण ७० लाख ७३ हजार ९२० रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर आरोपींविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गु.र.न. ७२४/२०२५ नुसार भारतीय न्याय संहिता कलम १७९, १८०, ३ (५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्या विरुद्ध कुर्डूवाडी पोलीस ठाणे, जिल्हा. सोलापूर येथे गु.र.न. ५०३/२०२२ प्रमाणे गुन्हा दाखल असून, सदर गुन्ह्यात आरोपी २२ महिने तुरुंगात होते.

सदरची कारवाई अहिल्यानगरचे पोलीस अधिक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. बसवराज शिवपुजे यांच्या सूचनेनुसार व मार्गदर्शनाखाली पो.नि. संजय ठेंगे यांच्या नेतृत्वाखाली उपनिरीक्षक संदीप मुरकुटे, हवालदार सुरज गायकवाड, राहुल यादव, विजय नवले, संदिप ठाणगे, कॉन्स्टेबल सतीश कुऱ्हाडे, अंकुश भोसले, प्रमोद ढाकणे, गणेश लिपणे, नदीम शेख यांच्या पथकाने केली.

सदर पथकात सहायक पोलीस निरीक्षक सुदाम शिरसाट, उपनिरीक्षक राजू जाधव, हवालदार श्री. साळवे, शिंदे, कॉन्स्टेबल श्री. पाखरे यांचा समावेश होता. सदर गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक संदीप मुरकुटे करीत आहेत.

## 'घरकुल'साठी नव्याने १ लाख ६२...

येत होता. पहिला टप्प्यामध्ये प्रतिक्षा यादीतील लाभार्थी मार्च २०२५ पर्यंत उद्दिष्ट पूर्ण केले जाणार आहे. त्याप्रमाणे लाभार्थ्यांचे रजिस्ट्रेशन करण्यात येऊन १५ हजार रुपये पहिला हप्ता खात्यामध्ये वर्ग करण्यात आला आहे. २०१८ मध्ये झालेल्या आवास प्लस सर्वेक्षणच्या प्रतिक्षा यादीमध्ये अनेक पात्र कुटुंबाचा समावेश नसल्याने या कुटुंबांना घरकुलाचा लाभ द्यावा, अशी मागणी मागील काही वर्षापासून लाभार्थी कुटुंबाकडून सातत्याने केली जात होती. यामुळे शासनाने प्रधानमंत्री आवास घरकुल योजना टप्पा क्रमांक दोन अंतर्गत १८ एप्रिल ते १८ जून या कालावधीत पात्र कुटुंबाची सर्वेक्षण मोहिम ऑनलाईन मोहिम राबवली. यात एकट्या नगर जिल्ह्यात १ लाख ६२ हजार लाभार्थी कुटूंबांनी घरकुलासाठी अर्ज केलेले आहेत.

**आतापर्यंत २ लाख ३५ हजार ६३९ घरकुल**

जिल्ह्याच्या ग्रामीण भागात राज्य सरकारने आतापर्यंत २ लाख ३५ हजार ६३९ घरकुलांची कामांना मंजूरी दिलेली आहे. यात प्रधानमंत्री घरकुल योजनेतील १ लाख ७९ घरकुलांचा समावेश आहे. घरकुल योजनेत पात्र ठरलेल्या कुटूंबाला सरकारच्यावतीने जवळपास घर बांधण्यासाठी जवळपास २ लाखांपर्यंत अनुदान देण्यात येते.

**नव्याने आलेले अर्ज**

अकोले १२ हजार ५२८, जामखेड १२ हजार ९५२, कर्जत १३ हजार ३३३, कोपरगाव ९ हजार ८३८, नगर ९ हजार २६३, नेवासा १४ हजार २५८, पारनेर १० हजार ८८६, पाथर्डी १२ हजार ११५, राहाता ८ हजार ४७४, राहुरी १० हजार १८२, संगमनेर १६ हजार ४३४, शेवगाव ८ हजार ९७७, श्रीगोंदा १० हजार ९३१, श्रीगोंदा १२ हजार ५९ यांचा समावेश आहे. यात १ लाख १३ हजार ५८४ कुटूंबांनी स्वत: घरकुल सर्वेक्षणात सहभागी होत ऑनलाईन अर्ज केलेला आहे तर ४८ हजार ६४६ लाभार्थ्यांनी यंत्रणेची मदत घेत घरकुल सर्वेक्षणात सहभागी नोंदवला आहे.

## आता आरपारची लढाई

या बैठकीत मराठा आरक्षणासह गेली दोन वर्षे मराठा समाजाला आंदोलन करून काय मिळालं? आणि आता काय मिळवायचं? या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली. तसेच २९ ऑगस्टच्या मुंबई आंदोलनाच्या नियोजनाबाबत देखील या बैठकीत चर्चा झाली.

या बैठकीनंतर मराठा आंदोलक जरांगे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला.आपल्याला रणभूमीत उतरायचं आहे आणि विजयही निश्चित मिळवायचा आहे. रणभूमीची तयारी अशी असली पाहिजे की, यावेळी यश आपलंच असणार, असे ठाम शब्दांत मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. ते पुढे म्हणाले, आपल्याला कोणीही थांबवू शकत नाही. मैदान आपणच गाजवायचं असून, विजयाचा गुलालही आपल्या अंगावरच उधळला गेला पाहिजे. मागील दोन वर्षांपासून मराठा समाजासाठी आंदोलन सुरू असून, आता ही लढाई अंतिम टप्प्यात आली आहे. ही शेवटची लढाई मराठ्यांनी जिद्दीने आणि एकजुटीने पार पाडली पाहिजे, असे आवाहनही त्यांनी मराठा बांधवांना केलं.

**विजयाची चाहूल लागली**

जरांगे पाटील पुढे म्हणाले की, २९ ऑगस्टला मुंबईला जायचं आहे. २७ ऑगस्ट रोजी अंतरवालीतून निघायचे आहे. कुठेही न थांबता २८ ऑगस्टला रात्री मुंबईत पोहचायचे आहे. मुंबईतील सर्वच लोकांनी यापूर्वी आपली सेवा केली, त्यात परप्रांतीय लोकांनी सुद्धा आपली सेवा केली आहे. पावसाचे दिवस असून मला तुम्ही मुंबईत सोडायला या, पुढचं मी पाहतो. आता अशी संधी पुन्हा मिळणार नसून विजयाची चाहूल लागली आहे, असे त्यांनी म्हटले.

## सोसाट्याचा वारा अन् पावसाचा...

भागात अजूनही अनेक तालुक्यात पावसाने सरासरीच्या ६० टक्के पावसाची सरासरी ओलांडलेली नाही. जून महिन्यांत नाशिक जिल्ह्यासह मूळा, भंडारदार, निळंवडे धरणाच्या पाणलोटात पावसाच्या दमदार हजेरीमूळे धरणसाठ्यात वाढ झालेली असली तरी जिल्ह्याचा उर्वरित भागत कोरडा असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात खरीप हंगामातील ४ लाख ५१ हजार हेक्टवर पिकांची पेरणी पूर्ण झालेली असून जिल्ह्याच्या दक्षिण भागात पेरणीचे प्रमाण अधिक आहे. यासह जिल्ह्यात १ लाख १० हजार हेक्टवर कपाशी लागवड झालेली असून खरीप हंगामातील पिके आता तहानली असल्याचे दिसत आहे. जूनच्या सुरूवातीपासून जिल्ह्यात मोठा पाउस झालेला नाही. यामुळे अनेक भागात सध्या शेतकरी विविध मार्गानी पिकांनी पाणी देतांना दिसत आहे. सध्या आषाढ महिना असून अनेक शेतकरी वारीच्या गडबडीत दिसत आहेत. मान्सूनने राज्य व्यापले असून सध्या मुंबई, कोकणपट्ट्यासह मराठवाड्यासह विदर्भातील अनेक जिल्ह्यात पावसाच्या सरी बरसतांना दिसत आहे. मागील वर्षी जूनअखेर जिल्ह्यात सरासरीच्या १७६ टक्के पावसाची नोंद झाली होती. यंदा हे प्रमाण ८० टक्के दिसत आहे. उत्तर जिल्ह्यातील अनेक तालुक्यात अद्याप सर्वदूर दमदार पाऊस झालेला दिसत नाही. परिणामी खरीपाच्या पेरण्या अथवा पेरणी झालेल्या पिकांना त्याचा फटका बसण्याची शक्यता असून यामुळे पावसाळ्यात शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत.

**नद्यांमधील विसर्ग**

रविवारी दुपारी १२ वाजेपर्यंत भिमा नदीतून १० हजार १९८ क्युसेक, गोदावरी नदी - नांदूरमध्यमेश्वर १० हजार ९५८ क्युसेक, घोड नदी- ३ हजार क्युसेक, सीना नदी १५७ क्युसेक विसर्ग सुरू होता.

## राज्यात सरासरीच्या ९३.६ टक्के...

आठवड्यापासून पावसाने पुन्हा हजेरी लावली आहे. आतापर्यंत २१ दिवस पावसाची नोंद करण्यात आली आहे. जून महिन्यात राज्यात २०७.६ मिलिमीटर सरासरी पाऊस पडतो. त्यानुसार आतापर्यंत १९४.३ मिलिमीटर अर्थात ९३.६ टक्के पाऊस नोंदविण्यात आला आहे. पूर्व विदर्भातील वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये सरासरीच्या केवळ ६१ टक्के पाऊस झाला आहे. तर मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यांमध्ये ८३.६ टक्के पाऊस झाला आहे. राज्यात सर्वाधिक पाऊस पुण्यात ११३ टक्के तर कोकण विभागात १०२, नाशिक विभागात १०१, अमरावती विभागात १०८ टक्के पावसाची नोंद झाली आहे. कृषी विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार, २८ जूनपर्यंत राज्यातील चार तालुक्यांमध्ये २५ टक्क्यांपेक्षा कमी पावसाची नोंद झाली आहे. राज्यातील १५ जिल्ह्यांमधील ३८ तालुक्यांमध्ये नोंदविण्यात आला आहे. यात नागपूर आणि बीड जिल्ह्यामधील प्रत्येकी पाच तालुक्यांचा समावेश आहे. तर ५० ते ७५ टक्के पावसाची नोंद राज्यातील २० जिल्ह्यांमधील ७१ तालुक्यांमध्ये करण्यात आली आहे. तर ७५ ते १०० टक्के पाऊस ३० जिल्ह्यांमधील ८७ तालुक्यांमध्ये पडला आहे. १०० टक्क्यांहून अधिक पाऊस २८ जिल्ह्यांमधील १५५ तालुक्यांमध्ये नोंदविण्यात आला आहे.

## कृषीच्या तालुकास्तरावरील...

घेण्यासाठी तालुकास्तरीय तक्रार निवारण समिती गठीत करण्यात आली होती. मात्र, या समितीत बदल करण्याच्या सुचना कृषी आयुक्त यांनी केल्या. त्यानूसार या समितीत बदल करण्यात आले आहेत.

या समितीत संबंधीत उपविभागाचे कृषी अधिकारी हे पूर्वी प्रमाणे अध्यक्ष राहणार असून या समितीत संबंधीत तालुक्याचे कषी अधिकारी सदस्य, कृषी विद्यापिठ- कृषी संशोधन केंद्र अथवा कृषी विज्ञान केंद्राची प्रतिनिधी यांच्यासह महाबील या कंपनीचे प्रतिनिधी व तालुकास्तरावरील कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) तालुका कृषी अधिकारी कार्यालय हे सदस्य सचिव म्हणून काम पाहणार आहेत.ही समिती तक्रार आल्यानंतर आठ दिवसात संबंधीत कृषी निविष्ठांची तापसणी करणार असल्याचे आदेश कृषी विभागाचे उपसचिव संतोष कराड यांनी काढले आहेत.